महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २३० वा | दिनांक : ०७/०७/२०२५ | वार : सोमवार

## काँग्रेसची मूल्ये स्वीकारणाऱ्यांसोबत काँग्रेस पक्ष पुढे जाईल - सपकाळ





**बुलढाणा :** मनसे प्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना (ठाकरे गट) प्रमुख उद्धव ठाकरे एकाच मंचावर येत 'त्रिभाषा सूत्र' मागे घेतल्याचा जल्लोष साजरा केल्यानंतर राज्याच्या राजकारणात नव्या युतीच्या चर्चांना उधाण आले आहे. यावर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आपली पहिली प्रतिक्रिया दिली असून, "समविचारी पक्ष असतील आणि काँग्रेसच्या मूल्यांना मान्यता देतील, तरच काँग्रेस अशा युतीसोबत पुढे जाईल," असे स्पष्ट मत व्यक्त केले आहे.

शनिवारी मुंबईत झालेल्या विजयी मेळाव्यात दोन्ही ठाकरे बंधू एकत्र आले होते. त्यामुळे राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या युतीची शक्यता राजकीय वर्तुळात चर्चेचा केंद्रबिंदू ठरली आहे. या पार्श्वभूमीवर हर्षवर्धन सपकाळ यांनी स्पष्ट केले की, हा मेळावा फक्त मराठी विषयाच्या पार्श्वभूमीवर एकत्र येऊन साजरा केलेला जल्लोष होता. ते आज बुलढाणा येथे माध्यमांशी बोलत होते.

काँग्रेस आणि राष्ट्रवादी पहिल्यापासूनच एकत्र लढत होती, मात्र भाजपला दूर ठेवण्यासाठी २०१९ मध्ये शिवसेनेने निर्णय घेतला. चर्चेनंतर महाविकास आघाडी अस्तित्वात आली. भाजपला दूर ठेवण्यासाठी राज्यात आणि देशात इंडिया अलायन्स तयार झाली. त्यावेळी आम्ही विधानसभा लोकसभा दोन्ही निवडणूक एकत्र लढलो. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आम्ही कोणतीही आघाडी युती केली नाही. स्थानिक पातळीवर समविचारी पक्षासोबत युती करण्याचे अधिकार स्थानिक नेतृत्वाला दिले आहेत. समविचारी पक्षांचा संदर्भ आज रोजी उद्धव ठाकरे यांच्याशी संबंधित आहे. व्यापक स्वरुपाचा निर्णय घेतला जाईल, काँग्रेसच्या मूल्यांना जे स्वीकारतील त्यांच्यासोबत काँग्रेस पुढे जाईल, असे सपकाळ यांनी स्पष्ट केले आहे.

विजयी मेळाव्यावर बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, मराठी विषयाच्या अनुषंगाने दोघांनी एकत्र येऊन साजरा केलेला हा जल्लोष आहे. आगामी काळात दोन्ही पक्षाकडून काही स्पष्टीकरण जेव्हा येईल तेव्हा चर्चा करता येईल. महापालिका, जिल्हा परिषद निवडणुका याबाबतचा निर्णय स्थानिक काँग्रेस कमिटीवर सोपवण्यात आला आहे. निवडणुका अद्याप जाहीर झाल्या नाहीत, त्या फेब्रुवारीमध्ये होतात की ऑक्टोबरमध्ये होतात की होतच नाही? हे गौडबंगाल आहे. मूळ विषय सोडून इतरत्र लक्ष भटकवणे हाच भाजपचा विषय आहे, अशी टीकाही त्यांनी केली.

हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, "या विजयी मेळाव्याचे एक दिवस अगोदर निमंत्रण होते. पण पूर्वनियोजित कामामुळे जाणे शक्य झाले नाही. विजय मेळाव्याला जाणे न जाणे हा दुय्यम भाग आहे. मात्र आगामी काळात मराठी भाषा वाचवण्यासाठी काँग्रेस पक्ष कटिबद्ध आहे. हिंदी सक्तीच्या विरोधाला राजकीय पक्ष विविध संघटना यांच्यासोबतच काँग्रेस पक्षाने सर्वात प्रथम विरोध केला होता, असा दावा देखील सपकाळ यांनी केला.

दरम्यान, राज आणि उद्धव ठाकरे यांच्यात युती झाल्यास तीसरी आघाडी तयार होईल आणि महाविकास आघाडीमध्ये फूट पडेल. यामुळे भाजपला अप्रत्यक्ष फायदा होईल, असे महायुतीतील नेत्यांकडून सांगितले जात आहे. त्यामुळे पुढील महापालिका व जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये काँग्रेस कोणाशी हातमिळवणी करते आणि कोणापासून अंतर ठेवते, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## मुख्यमंत्र्यांना अणाजी पंत म्हणणे हा अपमान - दीपक केसरकर



**मुंबई :** हिंदी सक्तीच्या विरोधात आणि मराठी भाषेच्या मुद्द्यावर राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र आले. मुंबईत पार पडलेल्या विजयी रॅलीमध्ये उद्धव ठाकरे यांनी भाजप आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार टीका केली. भाषणात त्यांनी फडणवीसांचा उल्लेख 'अणाजी पंत' असा करत टोला लगावला. यावर शिंदे गटाचे आमदार दीपक केसरकर यांनी प्रतिक्रिया देत उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली. राज्याच्या मुख्यमंत्र्यांचा अशा प्रकारे उल्लेख करणे म्हणजे मुख्यमंत्रिपदाचा अपमान असल्याचे केसरकर यांनी म्हटले.

राज्याच्या प्रमुखाला अणाजी पंत म्हणणं हे त्या पदाचा अपमान आहे. मुख्यमंत्र्यांची तुलना ही पेशव्यांशीही करता आली असती. राजकारणात वैचारिक मतभेद असावेत. पण ते व्यक्तिगत पातळीवर येऊ नयेत, असे स्पष्ट मत दीपक केसरकर यांनी व्यक्त केले आहे. पुढे ते म्हणाले, दोन भाऊ एकत्र आले ही चांगली गोष्ट आहे. अन्याय झाला म्हणून राज ठाकरे बाहेर पडले. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र आल्यावर राज ठाकरे यांच्यावर अन्याय होणार नाही अशी अपेक्षा. वापरा आणि फेकून द्या ही उद्धव ठाकरेंची नीती मी स्वतः अनुभवली आहे. राणेंच्या विरोधात माझा वापर करून घेतला. यूज अँड थ्रो अशी त्यांची नीती आहे, असे म्हणत उद्धव ठाकरेंवर टीका केली आहे.

दीपक केसरकर म्हणाले, उद्धव ठाकरे यांना गेल्या दोन निवडणुकांत मिळालेली मते ही फतव्याची मते आहेत. एकनाथ शिंदे यांनी बाळासाहेबांचा विचार कायम ठेवला. राज ठाकरे देखील उद्धव ठाकरे यांच्या सोबत जाऊन तो विचार कायम ठेवतील अशी अपेक्षा आहे. उद्धव ठाकरे त्या विचारापासून दूर गेल्याने त्यांना सगळे आमदार सोडून गेले. बाळासाहेबांची भूमिका ही कॉंगेस सोबत जाणार नाही अशी होती. उद्धव ठाकरेंनी बाळासाहेबांच्या भूमिकेला छेद दिला. आता उद्धव ठाकरे यांच्यासोबत गेल्यानंतर राज ठाकरेंची भूमिका काय हे लवकरच समजेल.

पुढे बोलताना दीपक केसरकर म्हणाले, मूळ पक्ष आणि पक्षाचे कार्यकर्ते आमच्यासोबत आहेत. त्यामुळेच उद्धव ठाकरे यांना आता राज ठाकरेंची गरज पडली असा टोला दीपक केसरकर यांनी लगावला. तर रस्त्यावरील सत्ता कुणाकडे आहे याचे उत्तर देणार नाही. कायद्याचे पालन सर्वांना करावे लागत. राज्यात भांडण, मारामाऱ्या होऊ नये एवढीच अपेक्षा आहे.

## भोजपुरी अभिनेत्याच्या विधानावर काँग्रेसचा संताप : विजय वडेट्टीवारांनी फटकारले

**मुंबई :** राज्यात मराठीच्या मुद्द्यावर वातावरण तापले असतानाच, भोजपुरी अभिनेता आणि भाजप खासदार दिनेश लाल यादव उर्फ 'निरहुआ' याने एक विधान करून नव्या वादाला तोंड फोडले. "मी मराठी बोलत नाही, दम असेल तर मला महाराष्ट्रातून हाकलून दाखवा," अशी मुक्ताफळे त्याने उधळली. यावर काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी त्याला चांगलेच फटकारले. तू महाराष्ट्रात येऊन उभा रहा म्हणजे कळेल तुला तुझी भोजपुरी कुठे आहे? असे जोरदार प्रत्युत्तर वडेट्टीवार यांनी निरहुआ याला दिले. शिवाय त्यांनी भाजप नेते आशिष शेलार यांच्यावरही निशाणा साधला.

उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे तब्बल १८ वर्षांनंतर एकाच व्यासपीठावर आले. त्यांनी मराठीचा हुंकार भरत, मुंबईत मराठीत बोलण्याचा आग्रह पुन्हा ठामपणे मांडला. मुंबईत मराठीत बोलण्याचा आग्रह दोन्ही बंधूंनी धरला. मुंबईत येऊन मराठी लोकांवर जो दादागिरी करेल, त्याला त्याच भाषेत उत्तर देण्याचा इशारा दिला. कालच्या ठाकरे बंधूंच्या विजयी मेळव्याला काँग्रेस नेते अनुपस्थित होते. पण आज काँग्रेस राज ठाकरेंच्या मदतीला धावली.

दिनेश लाल यादव निरहुआ भोजपुरी कलाकार असला तरी महाराष्ट्राच्या आणि मुंबईच्या भरोशावर मोठा झाला आहे, एखाद्या भाषेचा असा अपमान करणे म्हणजे त्या खासदाराच्या बुध्दीची दिवाळखोरी आहे, तू महाराष्ट्रात येऊन उभा रहा म्हणजे कळेल तुला तुझी भोजपुरी कुठे आहे? असे काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी म्हटले.

यावेळी त्यांनी भाजप नेते आशिष शेलार यांच्यावर हल्लाबोल केला. दोन भाऊ एकत्र आल्यामुळे शेलार यांना पहलगाम आठवायला लागले आहे, तुम्ही पाकिस्तानात जाऊन शंभर अतिरेकी मारल्याचे छाती ठोकून सांगत आहेत. मात्र पहलगामचे चार आतंकवादी अजून सापडलेले नाही, पुलवामामध्ये अडीचशे किलो आरडीएक्स आले, तुम्ही लोकांना वारंवार मूर्ख बनवू शकत नाही, त्यामुळे यांची भीती साहजिक आहे, दोन भाऊ एकत्र आल्यामुळे शेलार यांची पंचायत झाली आहे, म्हणून ते असे वक्तव्य करत आहे, असा टोला वडेट्टीवार यांनी लगावला.

मीरा रोड परिसरात मनसे कार्यकर्त्यांनी एका फास्ट फूड विक्रेत्याला मराठीत बोलण्यास भाग पाडल्याचा प्रकार घडल्यानंतर, निरहुआने प्रतिक्रिया दिली. "मी मराठी बोलत नाही. मी भोजपुरी बोलतो. जर तुमच्यात दम असेल, तर मला महाराष्ट्रातून बाहेर काढून दाखवा," असे खुले आव्हानच त्याने दिले होते. . त्याच्या या वक्तव्यावर आता काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी त्याचे कान टोचले आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०७ जुलै २०२५


## बसवेश्वर पतसंस्थेच्या चेअरमनपदी शिवशरण वरनाळे तर व्हाईस चेअरमनपदी शरणप्पा मुदकन्ना यांची बिनविरोध निवड



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील महात्मा बसवेश्वर व्यापारी नागरी सहकारी पतसंस्थेच्या नुकत्याच पार पडलेल्या संचालक मंडळ निवडणुकीनंतर नवनिर्वाचित संचालक मंडळाने शनिवारी (ता. ५ ) रोजी सर्वानुमते शिवशरण वरनाळे यांची चेअरमन पदी तर शरणप्पा मुदकन्ना यांची व्हाइस चेअरमन पदी बिनविरोध निवड केली. ही निवड जागतिक सहकार दिनाच्या निमित्ताने पतसंस्थेच्या बसव सहकार भवनच्या सभागृहात पार पडली. यावेळी पतसंस्थेच्या वतीने सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार ज्ञानराज चौगुले होते. यावेळी भीमराव वरनाळे, पॅनल प्रमुख चंद्रशेखर मुदकन्ना, भारत शिक्षण संस्थेचे संचालक तानाजी फुगटे, व्यापारी पतसंस्थेचे नूतन संचालक बाबासाहेब बिराजदार, शिवसेना तालुका प्रमुख बळीमामा सुरवसे, तालुका उपप्रमुख व्यंकटराव पाटील, आप्पासाहेब पाटील, माजी प्राचार्य दत्ता इंगळे, बलभीम येवते आदींची प्रमुख उपस्थिती होती. माजी आमदार ज्ञानराज चौगुले यांच्या हस्ते नवनिर्वाचित चेअरमन शिवशरण वरनाळे व व्हाइस चेअरमन शरणप्पा मुदकन्ना यांचा विशेष सत्कार करण्यात आला. या सत्कार प्रसंगी बोलताना चौगुले यांनी पतसंस्थेच्या सामाजिक व आर्थिक योगदानाचे कौतुक केले आणि संस्थेच्या आगामी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. त्यांनी नवीन नेतृत्वाकडून पारदर्शक कारभार व सभासदांच्या हितासाठी कार्य करण्याचा संदेश दिला. त्यांनी सहकार चळवळीवर प्रकाश टाकून पतसंस्थेला आर्थिकदृष्ट्या भक्कम करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने एकत्र राहण्याचे आव्हान केले. यावेळी शिवशरण वरनाळे, चंद्रशेखर मुदकन्ना यांनी यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक दत्ता इंगळे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोहन जाधव तर आभार मनीष मुदकन्ना यांनी मानले. या कार्यक्रमाला पतसंस्थेचे सर्व संचालक, कर्मचारी, सभासद व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विठ्ठल नामाची शाळा भरली



**कन्नड (स्वप्नील राठोड) :** आषाढी एकादशीनिमित्त कर्मवीर काकासाहेब देशमुख माध्यमिक विद्यालयाच्या प्रांगणात पारंपरिक भक्तिभावाने रिंगण सोहळा आयोजित करण्यात आला. शाळेच्या मैदानावर ‘विठ्ठल नामाचा गजर’, टाळ-मृदुंगाचा निनाद आणि वारकऱ्यांच्या वेशभूषेतील मुलांची पालखी मिरवणूक अनुभवताना परिसर विठ्ठलमय झाला होता. विद्यार्थ्यांनी संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, वासुदेव, विठ्ठल-रखुमाई आदी संतांच्या वेशभूषा परिधान करत वारीचे प्रत्यक्ष दर्शन घडवले. भगवे झेंडे, तुळशी वृंदावन, अभंग गायन आणि फुगडीच्या खेळांनी रिंगणाला रंगत आणली. ‘जय जय राम कृष्ण हरी’, ‘रूप पाहता लोचनी’ यासारख्या अभंगांच्या गजरात विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषेत टाळ, मृदुंग, वीणेच्या साथीने भक्तिरसात न्हालेलं वातावरण निर्माण केलं.शाळेचे मुख्याध्यापक रवींद्र पाटील, पर्यवेक्षक गणेश डव्हारे, वरिष्ठ लिपिक जगन्नाथ जाधव, सांस्कृतिक प्रमुख प्रदीप सनसे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी या भक्तिमय सोहळ्याला उपस्थित होते.कार्यक्रमाचा समारोप पसायदानाने करण्यात आला.

## विद्यार्थ्यांचे प्रेरणादायी संवाद सत्र



**छत्रपती संभाजीनगर :** मनपा केंद्रीय प्राथमिक शाळा, मुकुंदवाडी येथील विद्यार्थ्यांना आयुक्त तथा प्रशासक मा. श्री. जि. श्रीकांत साहेब यांच्याशी प्रत्यक्ष भेटीचा आणि संवादाचा अनमोल अनुभव मिळाला. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांशी साहेबांनी अत्यंत मनमोकळ्या वातावरणात संवाद साधला. विद्यार्थ्यांच्या अभ्यास, स्वप्ने, आवडीनिवडी तसेच त्यांच्या शाळेतील उपक्रमांबद्दल त्यांनी विशेष रुची दाखवली. साहेबांनी मुलांना चांगले शिक्षण घेण्याचे आणि पुढील जीवनात चांगले नागरिक होण्याचे मोलाचे मार्गदर्शन केले. या भेटीनंतर विद्यार्थ्यांनी दोन तास खेळामध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.ही भेट विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरली असून त्यांच्या मनात सकारात्मक ऊर्जा आणि आत्मविश्वास निर्माण झाला आहे.या प्रसंगी उपस्थित मान्यवर: उपायुक्त मा. श्री. अंकुश पांढरे साहेब, नियंत्रण अधिकारी मा. श्री. गणेश दांडगे साहेब, शिक्षणाधिकारी मा. श्री. भारत तीनगोटे साहेब, कार्यक्रम अधिकारी मा. श्री. ज्ञानदेव सांगळे मुख्याध्यापक श्री के. बी. चौधरी, श्रीमती मंगल निकम, श्रीमती शिल्पा माळोदे,संगीत शिक्षक श्री सुभाष खिल्लारे, क्रीडा प्रशिक्षक श्री इरफान सय्यद.







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०७ जुलै २०२५


## आषाढी एकादशीनिमित्त महात्मा फुले प्रा.शा. व न्यू हायस्कूल, कन्नड यांचा संयुक्त उपक्रम




**कन्नड (स्वप्नील राठोड) :** आज आषाढी एकादशीनिमित्त महात्मा फुले प्राथमिक शाळा आणि न्यू हायस्कूल, कन्नड यांच्या संयुक्त विद्यमाने काढण्यात आलेल्या दिंडी उत्सवाला माळीवाडा येथील ग्रामस्थांनी भरभरून प्रतिसाद देत उत्स्फूर्त स्वागत केले.या प्रसंगी श्री. कैलास जाधव, जाधव काका, प्रकाश भाऊ यांच्यासह गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत उपक्रमाचे मन:पूर्वक स्वागत केले.या धार्मिक आणि सांस्कृतिक सोहळ्यात विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून टाळ-मृदुंगाच्या गजरात “विठ्ठल-विठ्ठल” असा नामस्मरण गात भक्तिभाव, शिस्त आणि संस्कारांचे दर्शन घडवले.दिंडीद्वारे पर्यावरण संवर्धनाचा सकारात्मक संदेश देण्यात आला. “एक विद्यार्थी – एक झाड” या संकल्पनेवर विद्यार्थ्यांनी झाडे लावण्याचे आवाहन करून सामाजिक जबाबदारीची जाणीव दाखवली.कार्यक्रमाचे नेतृत्व न्यू हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री. विनोद पाटील सर आणि महात्मा फुले प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती शिंपी मॅडम यांनी केले.या वेळी दोन्ही शाळांचे शिक्षक उपस्थित होते. त्यामध्येखडेकर सर, सारंगधर सर, श्रीमती भोईटे मॅडम, पवार सर, राऊत सर, काळे सर, जाधव सर, पवार मॅडम, गोसावी सर, लोखंडे सर, पावरा सर, सोनवणे सर, माळी सर, तागवाले मॅडम, करवंदे सर, मोहिते मॅडम, शहा मामा आणि बापू आहेर यांचा सक्रिय सहभाग विशेष उल्लेखनीय ठरला.दिंडीमुळे परिसरात भक्तिभावाचे वातावरण निर्माण झाले. पालक व नागरिकांनी विद्यार्थ्यांचा उत्साह, संस्कारशीलता आणि सामाजिक भानाचे भरभरून कौतुक केले.

## महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाची खुलताबाद तालुका कार्यकारणी घोषित



**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाच्या खुलताबाद तालुकाध्यक्षपदी मूबारक पठाण आणि खुलताबाद प्रसिद्धी तालुका अध्यक्षपदी शाकीर शहा व अमोल गुंजाळ हे माथाडी कामगार विभागाच्या तालुका अध्यक्षपदी यांची नियुक्ती करण्यात आली, महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष राहुल जी.वडमारे यांनी त्यांना नियुक्तीचे पत्र दिले.महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाच्या नवीन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यासाठी राहुल जी.वडमारे यांच्या अध्यक्षतेखाली सुलतानपूर ता. खुलताबाद येथील ग्रूप ग्रामपंचायत सूलताणपूर चे सभागृह येथील स्वराज्य रक्षक, धर्म रक्षक ,छत्रपती संभाजी*महाराज व महामानव, बोधिसत्व, संविधान निर्माते, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले व नंतर ०६/ ०७/२०२५ रोजी बैठक घेण्यात आली. या आढावा बैठकीत जिल्हाध्यक्ष राहुल वडमारे यांनी सर्व नवनिर्वाचित पदाधिकारी व उपस्थित पक्षाचे वरिष्ठ पदाधिकारी यांना येणाऱ्या काळात महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाची बांधणी मजबूत कशी करायची गाव तेथे शाखा महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाची झाली पाहिजे आणि येत्या आगामी निवडणुकीत महाराष्ट्र रिपब्लिकन पक्ष स्वबळावर कसा निवडणूक लढविणार असल्याचे त्यांनी सांगितले व या सर्व बाबींवर सखोल चर्चा केली व या बैठकी दरम्यान या नवीन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे जिल्हाध्यक्ष राहुल जी.वडमारे यांच्या हस्ते नवीन पदाधिकाऱ्यांना नियुक्तीची पत्रे देण्यात आले. यावेळी पक्षाचे जिल्हा संघटक रतन जाधव यांच्या हस्ते शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला यावेळी प्रमुख उपस्थिती, जिल्हा सचिव बापूसाहेब चाबुकस्वार, हिरालाल जैयस्वाल शहराध्यक्ष व या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित ज्येष्ठ समाजसेविका अकीला मुबारक पठाण या उपस्थित होत्या.. ज्येष्ठ नेते महेंद्र गवई यांची होती बंडू तांदळे, सुलतानपूर महीला तालुकाध्यक्ष शिल्पा जाधव, पंकज कोतकर, पोपट निवृत्ती जाधव, अमोल घुसाळ, विलास महालकर, कैलास साखरे, बाबासाहेब ससाने, प्रभाकर शहाराव,अनिल इंगळे, अमित देशमुख, मुकेश मकासारे, मनोज पगारे, विकास तायडे आदींची उपस्थिती होती.

## ओबीसी नेते लक्ष्मण हाकेंना कायदेशीर नोटीस



**मुंबई :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याबद्दल नेहमी बेताल वक्तव्य करणाऱ्या व त्यांना शिवराळ भाषेत बोलणाऱ्या लक्ष्मण हाके यांच्या विरोधात कायदेशीर नोटीस बजावण्यात आली आहे. सामाजिक व माहिती अधिकार कार्यकर्ते नितीन संजय यादव यांनी ही नोटीस बजावली असून, हाके यांनी सात दिवसांत अजित पवार यांची लेखी माफी मागावी, अन्यथा न्यायालयात खेचण्याचा इशारा नितीन यादव यांनी दिला आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विरोधात वेळोवेळी जाणुनबुजुन बेताल वक्तव्य करणाऱ्या विरोधात कायदेतज्ज्ञ ॲड. शंतनु माळशिकारे यांच्या वतीने नितीन संजय यादव यांनी लक्ष्मण हाके यांना आज नोटीस बजावली. लक्ष्मण हाके यांनी अजित पवारांची लेखी माफी न मागितल्यास लक्ष्मण हाके यांना न्यायालयात खेचून दिवाणी, फौजदारी व अब्रुनुकसानीचा दावा दाखल करणार असल्याचे नितीन यादव यांनी म्हटले आहे.

लक्ष्मण हाके यांनी १९ जून २०२५ रोजी पुण्यामध्ये जाहीरपणे आरोप केला होता की, उपमुख्यमंत्री म्हणून अजित पवार यांनी महाज्योती योजनेला “दुय्यम वागणूक” दिली आहे.

त्यानंतर ३ जुलै २०२५ रोजी मुंबईतील गिरगाव चौपाटी येथे महाज्योती योजनेतील निधीच्या कथित कमतरतेवर लक्ष वेधण्यासाठी निदर्शनादरम्यान, हाके यांनी अजित पवार यांच्यासाठी “हरामखोर” या अपमानास्पद शब्दाचा वापर केला. इतकंच नाही, तर मालेगाव कारखाना निवडणुकीत पवारांनी आर्थिक गैरव्यवहार केल्याचाही आरोप करत, ओबीसी समुदाय त्यांच्यापासून दुरावल्याचे म्हटले होते.




# महाराष्ट्र जनशक्ती


website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०७ जुलै २०२५


# संविधानातील उदात्त मूल्यांच्या संरक्षणासाठी सर्वांनी एकत्र आले पाहिजे.


## एम.ए. बेबी, सरचिटणीस, भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी)

### अनुवाद : प्रा. प्रियदर्शन भवरे, समाजशास्त्र विभाग, बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना.

भारताचे संविधान

उद्देशिका

**आ**म्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस :
सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय** ;
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे **स्वातंत्र्य** ;
दर्जाची व संधीची **समानता** ;
निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून ;
**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

**भा**रताचे संविधान केवळ एक कायदेशीर दस्तऐवज नाही, तर ते वसाहतवादीविरोधी संघर्षाच्या अग्नीतून निर्माण झालेल्या, राष्ट्राच्या आदर्शांचे आणि आकांक्षांचे मूर्तिमंत रूप आहे. समाजवाद आणि धर्मनिरपेक्षता ही त्याच्या सर्वात मूलभूत तत्त्वांपैकी आहेत. ही मूल्ये केवळ प्रस्तावनेपुरती मर्यादित नसून, ती संविधानाच्या संपूर्ण मजकुरात, राज्य धोरणाच्या निर्देशक तत्त्वांमध्ये, मूलभूत हक्कांमध्ये आणि त्याच्या रचनेत विणलेली आहेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या (RSS) नेतृत्वाने अलिकडे संविधानाच्या प्रस्तावनेतून समाजवाद आणि धर्मनिरपेक्षता हे शब्द काढून टाकण्याची केलेली मागणी केवळ शब्दांवरचा हल्ला नाही, तर भारतीय प्रजासत्ताकाच्या मूलभूत दृष्टिकोनावर केलेला थेट हल्ला आहे.

५० वर्षांपूर्वी घडलेल्या आणीबाणीवर टीका करण्याच्या नावाखाली आरएसएसच्या सरचिटणीसांनी ही मागणी अलिकडेच केली आहे. कारण समाजवाद आणि धर्मनिरपेक्षता हे शब्द आणीबाणीच्या काळात संविधान (४२ वी सुधारणा) अधिनियम, १९७६ द्वारे प्रस्तावनेत समाविष्ट करण्यात आले होते. आरएसएसने या तत्त्वांना बदनाम करण्यासाठी आणीबाणीचा आधार घेणे ही एक फसवी चाल आहे, विशेषतः जेव्हा त्यांनी स्वतःच्या अस्तित्वासाठी त्यावेळी इंदिरा गांधी सरकारच्या काळात संगनमत केले होते. संविधानाला कमजोर करण्यासाठी इतिहासातील त्या घटनेचा वापर करणे हे आरएसएसचा दांभिकपणा आणि संधीसाधूपणा दर्शवते.

प्रस्तावनेत आणि त्यापलीकडे प्रतिबिंबित असलेला भारतीय संविधानातील समाजवाद म्हणजे सामाजिक आणि आर्थिक न्याय, असमानता दूर करणे आणि कल्याणकारी राज्याची निर्मिती करण्याची कटिबद्धता आहे. भारतीय संविधानाची प्रस्तावना सर्व नागरिकांना "सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय" देण्याचे वचन देते आणि "दर्जाची व संधीची समानता" मिळवू इच्छिते. यावरून हे स्पष्ट होते की, ४२ व्या दुरुस्तीपूर्वीही समाजवादाचा आत्मा आपल्या संविधानात नेहमीच उपस्थित होता.

भारतीय संविधानात नागरिकांचे स्वातंत्र्य वाढवण्यासाठी आणि समाजातील प्रचलित असमानता कमी करण्यासाठी महत्त्वपूर्ण प्रयत्न झाले आहेत. मूलभूत हक्क त्या दिशेने टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल होते. अनुच्छेद १४ कायद्यासमोर समानता सुनिश्चित करतो, अनुच्छेद १५ धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान या कारणांवरून भेदभाव करण्यास मनाई करतो, अनुच्छेद १६ सार्वजनिक रोजगाराच्या बाबतीत समान संधी सुनिश्चित करतो. हे हक्क, प्रस्तावना आणि निर्देशक तत्त्वांसह वाचल्यास, शोषणमुक्त समाजाची कल्पना मांडतात, जिथे प्रत्येक व्यक्तीच्या प्रतिष्ठेचा सन्मान केला जातो.

भारतीय संविधानातील राज्य धोरणाची निर्देशक तत्त्वे समाजवादी दृष्टिकोनाचे स्पष्ट स्पष्टीकरण देतात. अनुच्छेद ३८ आणि ३९ ते स्पष्टपणे मांडले आहे आणि अनुच्छेद ४१, ४२ आणि ४३ मध्ये त्याचे अधिक स्पष्टीकरण दिले आहे. ही तरतुद केवळ आकांक्षा नाहीत, तर त्यांनी भारतातील ऐतिहासिक कायदे आणि न्यायिक विवेचनाला मार्गदर्शन केले आहे.

भारतीय संविधानातील धर्मनिरपेक्षता म्हणजे केवळ धार्मिक तटस्थता नाही, तर राज्य सर्व धर्मांना समान वागणूक देईल, अल्पसंख्यांकांच्या हक्कांचे संरक्षण करेल आणि कोणत्याही नागरिकाला धर्माच्या आधारावर भेदभाव सहन करावा लागणार नाही याची सकारात्मक हमी आहे. १९७६ मध्ये 'धर्मनिरपेक्ष' हा शब्द जोडण्यापूर्वीही, मूळ प्रस्तावनेने "विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा आणि उपासना यांचे स्वातंत्र्य" आणि "व्यक्तीची प्रतिष्ठा आणि राष्ट्राची एकता व एकात्मता सुनिश्चित करणारी बंधुता" यांचे वचन दिले होते.

मूलभूत हक्कांतर्गत, अनुच्छेद २५ ते २८ धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार प्रदान करतात आणि भारतीय प्रजासत्ताकाच्या धर्मनिरपेक्ष स्वरूपावर अधिक भर देतात. सांस्कृतिक आणि शैक्षणिक हक्कांशी संबंधित अनुच्छेद २९ आणि ३० देखील याच गोष्टीचा पुनरुच्चार करतात. हे अनुच्छेद असे सुनिश्चित करतात की, राज्य कोणत्याही धर्माशी स्वतःला जोडून घेत नाही किंवा कोणत्याही धर्माला विशेष वागणूक देत नाही. तसेच, प्रत्येक नागरिकाला, तो कोणत्याही धर्माचा असो त्याला समान अधिकार आणि संरक्षण मिळते. भारताच्या सर्वोच्च न्यायालयानेही वारंवार हेच सांगितले आहे की, धर्मनिरपेक्षता हे संविधानाच्या 'मूळ संरचनेचा' भाग आहे.

मूलभूत संरचना सिद्धांत १९७३ मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या केशवानंद भारती खटल्यातील ऐतिहासिक निर्णयात मांडला गेला. तो असे सांगतो की, संसद संविधानात दुरुस्ती करू शकते, परंतु त्याची मूलभूत रचना बदलू शकत नाही, म्हणजे संविधानाची मूलभूत रचना ही अमर आहे. आधी सांगितल्याप्रमाणे, संविधानाच्या प्रस्तावनेत समाजवाद आणि धर्मनिरपेक्षता हे शब्द समाविष्ट करणारी ४२ वी दुरुस्ती १९७५ मध्ये, या ऐतिहासिक निर्णयानंतर तीन वर्षांनी लागू करण्यात आली. तरीही, हे बदल केले जाऊ शकले, कारण त्यांनी संविधानाच्या मूलभूत संरचनेचे उल्लंघन केले नाही.

संविधानाच्या प्रस्तावनेतील समाजवाद आणि धर्मनिरपेक्षता हे केवळ १९७० च्या दशकातील 'जोडणे' किंवा 'लादलेले' आहेत असा दावा करणे चुकीचे आहे. संविधान सभेचा वस्तुनिष्ठ ठराव, संविधान सभेतील झालेल्या चर्चा आणि भारताच्या गौरवशाली वसाहतवादी विरोधी स्वातंत्र्य संग्रामाचा प्रत्यक्ष अनुभव हे सर्व दर्शवतात की, ही मूल्ये प्रजासत्ताकाच्या संस्थापकांच्या दृष्टिकोनात केंद्रस्थानी होती.

संविधानाची सामाजिक आणि आर्थिक न्याय, समानता आणि बंधुत्वासाठीची कटिबद्धता ही अंतर्भूतपणे समाजवादी आहे. धार्मिक स्वातंत्र्य, भेदभाव विरहित आणि अल्पसंख्याक हक्कांची हमी ही अंतर्भूतपणे धर्मनिरपेक्ष आहे. जरी समाजवादी आणि धर्मनिरपेक्ष (धर्मनिरपेक्ष हा शब्द ४२ व्या दुरुस्तीपूर्वीही अनुच्छेद २५(२) (अ) मध्ये होता) हे शब्द प्रस्तावनेतून काढून टाकले तरी, संविधानाचे मूळ तत्त्वज्ञान, संरचना आणि तरतुदी त्यांच्या आशयामध्ये अपरिवर्तित राहतील.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे २५ नोव्हेंबर, १९४९ रोजी संविधान सभेतील अंतिम भाषण, समानता (जो समाजवाद आणि धर्मनिरपेक्षतेच्या कल्पनांचा आधार आहे) ही संविधानाच्या आत्म्यात आणि रचनेत कशी रुजलेली आहे, या युक्तिवादाला बळकटी देणारे असून सखोल अंतर्दृष्टी प्रदान करते. बाबासाहेब आंबेडकरांचे हे शब्द या मूलभूत मूल्यांना कमी करण्याच्या कोणत्याही प्रयत्नाविरुद्ध एक मार्गदर्शक असे आहेत.

संविधानाच्या प्रस्तावनेतून समाजवाद आणि धर्मनिरपेक्षता काढून टाकण्याची आरएसएसची मागणी भारतीय प्रजासत्ताकाच्या मूळ पायाला कमजोर करण्याची एक सुनियोजित चाल आहे. ती संविधानाची जागा छद्म मनुस्मृतीने घेण्याचा, भारताच्या धर्मनिरपेक्ष लोकशाही प्रजासत्ताकाला उलथवून टाकण्याचा आणि धर्मशासित हिंदू राष्ट्र निर्माण करण्याचा त्यांचा दीर्घकाळ चाललेला अजेंडा उघड करते. प्रस्तावनेतून समाजवाद आणि धर्मनिरपेक्षता मिटवण्याचा प्रयत्न म्हणजे इतिहास पुन्हा लिहिण्याचा, भारताच्या वसाहतवादी विरोधी स्वातंत्र्य संग्रामाचा वारसा बेकायदेशीर ठरवण्याचा आणि जुलमी बहुसंख्यवादी राज्यासाठी मार्ग मोकळा करण्याचा प्रयत्न आहे.

भारताचे संविधान हा एक जिवंत दस्तऐवज आहे, जो सर्वांसाठी न्याय, स्वातंत्र्य, समानता आणि बंधुत्व सुरक्षित करण्यासाठी निर्माण केला गेला आहे. समाजवाद आणि धर्मनिरपेक्षता हे असे स्तंभ आहेत ज्यावर भारतीय प्रजासत्ताकाची इमारत उभी आहे. त्यांच्यावर हल्ला करणे म्हणजे भारताच्या लोकशाहीच्या आत्म्यावर हल्ला करणे होय. स्वातंत्र्य संग्रामाची मूल्ये जपणाऱ्या (ज्या संघर्षाचा आरएसएस भाग नव्हता) सर्वांनी संविधानाच्या उदात्त मूल्यांच्या संरक्षणासाठी एकत्र उभे राहिले पाहिजे आणि भारताच्या परिकल्पनेचा नाश करण्याच्या कोणत्याही प्रयत्नाला विरोध केला पाहिजे.

**मूळ इंग्रजी लेख : द हिंदू (मुंबई आवृत्ती) ४ जुलै २०२५**


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002